# १ ले गिरीमित्र संमेलन: १४ जुलै २००२

आंतरराष्ट्रीय पर्वत वर्षात झालेल्या या पहिल्या संमेलनासाठी जवळपास ४०० ते ५०० गिर्यारोहक एकत्र जमले होते. अर्थात हा सर्व खूप वर्षानंतर जमून आलेला स्नेहमेळावाच होता. त्यामुळे औपचारिकता अशी नव्हती आणि खास आराखाडासुद्धा नव्हता. होती ती फक्त गिर्यारोहकांनी एकत्र येण्याची आणि विचारांची देवाण घेवाण करण्याची एक जबरदस्त इच्छा.

पहिल्या पिढीतील गिर्यारोहक श्री. शरद ओवळेकरसर, ज्यांनी गिर्यारोहकांच्या कित्येक पिढ्या घडविल्या, त्यांनी संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. तर उदघाटक होते श्री. रामदास गुजराथी आणि स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ गिर्यारोहक श्री. हृषिकेश यादव.

पहिलेच संमेलन असल्यामुळे सुरूवातीचा वेळ हा संमेलनाची पार्श्वभूमी, स्वरूप या बाबींच्या स्पष्टीकरणात गेला. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. ओवळेकरसरांनी संमेलनाच्या आयोजनाबद्दल संबंधितांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. संमेलनाचे मुख्य आकर्षण होते भारतातील पहिल्या नागरी एव्हरेस्ट मोहीमेचे सादरीकरण आणि त्या मोहिमेत सहभागी झालेल्या श्री. ऋषिकेश यादव आणि श्री. उदय कोळवणकर यांची मुलाखत. सोबत श्री. जगन्नाथ राउळ यांचा 'दुर्ग दुर्गेश्वर रायगड' हा रायगडावरील छायचित्रांचा स्लाईड शो ज्यामध्ये होते सह्याद्रीच्या इतिहासाचे मनोज्ञ दर्शन. यावेळी सह्याद्रीतील १०० सुळके सर करणाऱ्या प्रदीप केळकर यांनी प्रस्तरारोहणाचे थरारक असे दृकश्राव्य सादरीकरण केले. शिवाय 'आरोहक, पुणे' यांच्या 'कात्रा कड्या'वरील' चढाईची श्वास रोखून धरायला लावणारी फिल्म दाखविण्यात आली.

इतर कार्यक्रमांतर्गत होते दोन महत्त्वाचे कार्यक्रम. पहिला, आतापर्यंत वेगवेगळ्या मोहिमांमध्ये गिरिकंदरातच चिरनिद्रेत विसावलेल्या ज्ञात व अज्ञात गिर्यारोहकांना एक स्मृति-स्मारकस्तंभ उभारून वाहिलेली श्रद्धांजली आणि दुसरा आतापर्यंत विविध मोहिमांच्या वेळी असंख्य गिर्यारोहकांना 'डोंगर वाटाड्या' म्हणून मदत करणाऱ्या स्थानिकांचा सत्कार. त्यासाठी प्रातिनिधिक स्वरूपात श्री. कृष्णामामा व मामी आगिवले (माहुली), श्री. व सौ. बाळू चौधरी (आजोबा डोंगर), श्री. जाऊ कातकरी (बाणचा पायथा), श्री. बाळू पारधी (कोंदिवडे), श्री. कमळू पारधी (इर्शाळवाडी) आदींना निमंत्रित करण्यात आले होते. दुर्गभ्रमंती व इतिहासावर विपुल लेखन केलेले सुप्रसिद्ध लेखक कै. गो. नी. दांडेकर यांनी टिपलेल्या अनेक दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शनही संमेलनस्थळी आयोजित करण्यात आले होते.

एकंदरीत गिर्यारोहकांना एकत्र आणण्याच्या पहिल्याच प्रयत्नात कोणतीही संकल्पना नसताना, विविध विषयांवर चर्चा व सादरीकरण घडवून आणण्यात पहिले संमेलन यशस्वी झाले होते.

*****************